



दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध


Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २४२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१४ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056





## कल्याण-नगर महामार्ग भीषण अपघातात ११ जणांचा जागीच मृत्यू

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, कल्याण (ठाणे) :** कल्याण-मुरबाड मार्गावर काळजाचा थरकाप उडवणारी घटना सोमवारी घडली. एक सिमेंट मिक्सर आणि काळी-पिवळी ईको टॅक्सी यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हा अपघात इतका भीषण होता की, ईको कारचा अक्षरशः चक्काचूर झाला असून गाडीचा सांगाडा ओळखणेही कठीण झाले आहे.

**पांजरा पुलावर काळाचा घाला...**

मिळालेल्या माहितीनुसार, रायते येथील पांजरा पुलावर सकाळी ११ च्या सुमारास ही घटना घडली. ईको गाडीतून मुरबाडमधील काही रहिवासी कल्याणच्या दिशेने जात होते. याच दरम्यान पांजरा पुलावर समोरून येणाऱ्या सिमेंट मिक्सरने कारला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एक आजी आश्चर्यकारकरीत्या बचावल्या आहेत.

**एकाच कुटुंबातील तिघांसह महसूल अधिकाऱ्याचा अंत**

प्रवाशांनी भरलेल्या ईको कारला झालेली धडक इतकी भीषण होती की, कारमधील



प्रवाशांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. या कारमध्ये एकूण १२ प्रवासी होते, त्यापैकी ११ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली.

या अपघातात मृतांची नावे आता समोर येत आहेत; ज्यामध्ये प्रशांत चंदने, जिजा गोविंद केंबरे, भूषण घोरपडे, अनंत पवार, दीपक गवळी आणि गणपत जेतू मदे यांचा दुर्दैवी अंत झाला आहे. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तीन सदस्यांचा समावेश आहे. तसेच, मुरबाड येथे सर्कल अधिकारी म्हणून कार्यरत असलेले महसूल अधिकारी भूषण घोरपडे यांचाही या अपघातात मृत्यू झाला आहे.

**स्थानिकांची मदतीसाठी धाव**

अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. चक्काचूर झालेल्या कारमधून मृतदेह बाहेर काढण्याचे काम स्थानिकांनी अत्यंत जड अंतःकरणाने केले. टिटवाळा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी मृतांचा अधिकृत आकडा अद्याप जाहीर केला नसला तरी, ही संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

**अपघाताचे नेमके कारण अस्पष्ट...**

हा अपघात नेमका कशामुळे झाला? चालकाचा ताबा सुटला की वेगाचा अतिरेक नडला? हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. टिटवाळा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला होता. एका गंभीर जखमी प्रवाशावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## राजुरा तहसील हादरलं !

### आदिवासी शेतकऱ्याचं एसडीएम कार्यालयातच सामूहिक विषप्राशन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, राजुरा (चंद्रपूर) :** चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा उपविभागात घडलेली ही धक्कादायक घटना आदिवासी हक्कांच्या प्रश्नाला पुन्हा एकदा ऐरणीवर आणणारी ठरली आहे. कोरपना तालुक्यातील कुसुंबी परिसरातील कोलाम आदिवासी शेतकऱ्यांनी गेल्या १५ वर्षापासून प्रलंबित असलेल्या जमिनीच्या मोबदल्याच्या मागणीसाठी अखेर टोकाचे पाऊल उचलत उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयातच विषप्राशन केले.

**१५ वर्षाचा संघर्ष, तरीही न्याय नाही**

माणिकगड सिमेंट कंपनी (अल्ट्राटेक) गडचांदूर येथील चुनखडी खाण प्रकल्पासाठी सुमारे १५ वर्षापूर्वी कुसुंबी आणि आसपासच्या गावातील १९ आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या. मात्र, या जमिनींचा योग्य मोबदला अद्याप मिळाला नसल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. अनेक वेळा निवेदन, आंदोलन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करुनही प्रश्न सुटला नाही.

**मोजणी आदेशही कागदावर**

दहा महिन्यांपूर्वी उपविभागीय अधिकारी रविंद्र माने यांनी सर्व्हे नंबर ४४, ४५, ४६ व ४७ या जमिनींची मोजणी करण्याचे आदेश दिले होते. परंतू आजपर्यंत प्रत्यक्ष मोजणी झाली नसल्याने मोबदला किंवा जमिनीचा ताबा मिळण्याचा प्रश्न प्रलंबितच राहिला. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी होती.

**कार्यालयातच विषप्राशन !**

सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास संतप्त झालेल्या पाच आदिवासी शेतकऱ्यांनी राजुरा उपविभागीय अधिकारी कार्यालयातच विषप्राशन केले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

विषप्राशन करणाऱ्यांमध्ये लच्चू चिन्नू मडावी (वय ५५, बाबेझरी), जयराम गंगू मडावी (वय ४५ नोकारी), जंगू सोमा पेंदोर ( वय ४८, कुसुंबी), बालाजी सिडाम ( वय ५२, नोकारी), आणि मारोती कर्णू तलांडे( वय ५५, कुसुंबी) यांचा समावेश आहे. काही अहवालांमध्ये नावे व वयात किरकोळ फरक दिसून येतो. मात्र, घटनेचा स्वरुप एकच आहे.

घटनेची माहिती मिळताच राजुरा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि सर्व जखमींना राजुरा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस आशाताईंची शेवटची इच्छा पूर्ण करणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची आज महत्त्वाची बैठक पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत ७ मोठे आणि महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये शासकीय सेवेतील पदांच्या भरतीबाबत निर्णय घेण्यात आला.

यासह अनेक महत्त्वाचेदेखील निर्णय घेण्यात आले. या बैठकीनंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन झालं आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांना एका प्रकल्प सूचवला होता. तो प्रकल्प राज्य सरकार पूर्ण करणार असल्याचं विखे पाटील म्हणाले आहेत.

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवत महत्त्वाची विनंती केली होती. आशा भोसले यांनी १९ ऑक्टोबर २०२५ मुख्यमंत्री कार्यालयाला पत्र पाठवलं होतं. या पत्रात मुंबईत संगीत अकादमी उभारण्यासाठी किमान २००० चौरस मीटर जागा देण्याची विनंती केली होती. नवोदीत गायक-गायिकांना व्यासपीठ मिळवून देणं आणि संगीत शिक्षणाचा प्रसार करणे यासाठी त्यांनी विनंती केली होती.

आशा भोसले यांचं काल निधन झालं. त्यामुळे आशा भोसले यांची मुंबईत संगीत अकादमी सुरु



करण्याची इच्छा अपूर्ण राहिली. ही इच्छा आपण पूर्ण करु, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. विशेष म्हणजे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत महत्त्वाची प्रतिक्रिया दिली.

**राधाकृष्ण विखे पाटील काय म्हणाले?**

आशा भोसले यांच्या दुखद निधनाने आज महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. आशाताईंनी मुख्यमंत्र्यांना एक प्रकल्प सुरु करण्याची विनंती केली होती. तो प्रकल्प पुढे नेण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी सुतोवाच केलेलं आहे. राज्य सरकारच्या वतीने तो प्रकल्प पूर्ण केला जाईल, असं मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले आहेत.

**राज्य मंत्रिमंडळात घेण्यात आलेले ७ मोठे निर्णय :**

शासन सेवेतील पदांच्या भरती प्रक्रियेत सुधारणा करणार. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला अनुसरून कृती आराखडा. एमपीएससीच्या माध्यमातून घेणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या ५३ वरून १५३. संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने काही सेवांचा समावेश होणार. भरती प्रक्रीया सुलभ होणार. युपीएससीच्या धर्तीवर महाजॉब्स पोर्टलद्वारे निपुण सेतू उपक्रम राबविणार. **(सामान्य प्रशासन विभाग)**

कुळगांव-बदलापूर मधील मंजूर विकास आराखड्यातील स्टेडीयमच्या आरक्षणात बदल करून वीज उपकेंद्राकरिता जमीन देणार. चार एकर जमीन टाटा पॉवर कंपनीस हस्तांतरीत करण्याचा निर्णय. **(नगरविकास विभाग)**

मुंबईत आयईएस स्किल टेक विद्यापीठ होणार. विद्यापीठ स्थापनेस मंजुरी. कायम स्वयंअर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठाच्या स्थापनेमुळे कुशल मनुष्यबळ विकासाला चालना मिळणार

**(कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग)**

नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत सागरी जिल्ह्यांमध्ये मच्छिमारांसाठी मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देणार. त्यासाठी ६१ कोटी २४ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी.

**(पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग)**




## बाबासाहेबांची पत्रकारिता !

विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३५ वी जयंती. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे.

डॉ बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.

इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी आम्ही शासनकर्ती जमात बनणार या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की,त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती.

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते.

**पत्रकार महामानव डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!!**

**- श्याम ठाणेदार**

# कठीण राहांचे राही डॉ.आंबेडकर



मध्यप्रदेशात इंदूर जिल्ह्यातील महू हे एक छोटेसे उपनगर आहे. येथे १४ एप्रिल १८९१ रोजी बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म माता भीमाबाई यांच्या कुशीत झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी सकपाल होते. ते महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील आंबावडे या गावचे रहिवासी होते. ते महार जातीतले, अत्यंत गरीब पण धार्मिक प्रवृत्तीचे होते. मुलाचे नाव आईच्या नावावरून भीम ठेवण्यात आले. आई-वडिलांची १४ वी संतान असल्याने कुटुंबीय त्यांना प्रेमाने चौदावे रत्न असेही म्हणत.

भीमच्या जन्मानंतर तीन वर्षांनी, १८९४ मध्ये वडिलांनी सैन्यातील सुभेदार पदावरून निवृत्ती घेतली. फक्त पन्नास रुपये मासिक पेन्शनवर उदरनिर्वाह करणे कठीण होते, त्यामुळे साताऱ्यात स्टोअरकीपर म्हणून नोकरी स्वीकारावी लागली.

**१४ एप्रिल जयंती निमित्त विशेष**

यामुळे रामजी सकपाल यांची बदली गोरेगाव येथे झाली. पत्नी भीमाबाई आणि दोन्ही मुले साताऱ्यातच राहिली. भीमाबाई आजारी पडल्या आणि त्यांचे निधन झाले. त्या वेळी भीमचे वय फक्त पाच वर्षांचे होते. आईच्या निधनामुळे तो खूप दुःखी झाला आणि रडू लागला. १९१३ मध्ये वडिलांचेही निधन झाले, त्यामुळे त्यांचे दुःख अधिकच वाढले.

**अस्पृश्यतेमुळे बालपणात अपमान**

लहानपणी त्यांना जातीय भेदभावाचा सामना करावा लागला. त्यांना अस्पृश्य मानले जात असे. त्यामुळे शाळेत जाणे, पाणी पिणे यामध्ये अनेक अडचणी येत. शाळेतही इतर मुलांबरोबर ते पाणी पिऊ शकत नव्हते. अनेक वेळा त्यांना स्पर्श करण्याचीही परवानगी दिली जात नव्हती.

एकदा शाळेत जाताना दोन्ही भावांनी बैलगाडीत बसण्याचा प्रयत्न केला. गाडीवानाला कळले की ते अस्पृश्य महार जातीतले आहेत, तेव्हा त्याने रागाने गाडी थांबवून त्यांना खाली ढकलले.

जिथे एकीकडे अशा प्रकारचे छुआछूत होते, तिथेच दुसरीकडे काही चांगले लोकही होते. एका सनातनी ब्राह्मण शिक्षकांनी भीमवर खूप प्रेम केले. डॉ. आंबेडकर म्हणत असत, मला अभिमान वाटतो की त्या प्रेमाच्या दाळ-भाकरीची गोडी काही वेगळीच होती. त्या आठवणींनी माझे हृदय भरून येते.

जेव्हा डॉ. आंबेडकर लंडनला गोलमेज परिषदेसाठी गेले, तेव्हा अनेक नामांकित शिक्षकांनी त्यांना पत्राद्वारे शुभेच्छा दिल्या. त्या शिक्षकांचा भीमच्या मनावर खोल प्रभाव पडला होता. त्यांच्या सन्मानार्थ भीमराव यांनी आंबेडकर हे आडनाव स्वीकारले. त्यामुळे ते आंबावडेकर ऐवजी आंबेडकर म्हणून ओळखले जाऊ लागले.

मुंबईतील जीवन खूप कष्टप्रद होते. त्यांच्या शाळेतील शिक्षक श्री. कृष्णाजी केळुस्कर यांनी त्यांच्या अभ्यासातील आवड पाहून त्यांना मदत केली. त्यांनीच भीमरावांना गौतम बुद्ध यांच्यावरील पहिले पुस्तक वाचायला दिले. संगीत, साहित्य आणि कलेतही त्यांना प्रोत्साहन दिले, ज्यामुळे त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक झाला.

ठाम निश्चय असलेल्या भीमरावांसाठी अडचणी अडथळे ठरल्या नाहीत, तर त्या आव्हान बनल्या. १९०८ मध्ये त्यांनी एलफिन्स्टन कॉलेजमधून मॅट्रिक उत्तीर्ण केले. १९१० मध्ये इंटरमिजिएट आणि १९१२ मध्ये बी.ए. पूर्ण केले. बी.ए. नंतर बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड आणि स्थानिक लोकांनी त्यांचे स्वागत केले. इंटरनंतर त्यांना दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती मिळू लागली. त्यांच्या आयुष्यात या मदतीचे मोठे महत्त्व होते.

**अमेरिका प्रवास...**

१९१३ मध्ये त्यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला. तेथे त्यांनी अर्थशास्त्र, राजकारण आणि इतिहासाचा सखोल अभ्यास केला. ते दररोज १६ तास अभ्यास करत आणि उर्वरित वेळ दैनंदिन कामांसाठी वापरत. १९१५ मध्ये त्यांनी एम.ए. पूर्ण केले आणि १९१६ मध्ये पीएच.डी. चे कार्य पूर्ण केले. आर्थिक अडचणींमुळे त्यांचा प्रबंध लगेच प्रकाशित झाला नाही. सुमारे १० वर्षांनी, १९२६ मध्ये तो प्रकाशित झाला. त्यामुळे ते पूर्णपणे डॉक्टर झाले. ऑगस्ट १९१७ मध्ये त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण करून भारतात परतले.

**विद्वान प्राध्यापक !**

सवर्ण आणि उच्च जातीतल्या विद्यार्थ्यांना सुरुवातीला वाटत होते की एक अस्पृश्य प्राध्यापक काय शिकवणार? पण काहीच दिवसांत ते लोकप्रिय प्राध्यापक झाले. ते वर्गात जे शिकवत, तेच विद्यार्थ्यांसाठी पुरेसे ठरत असे आणि वेगळे पुस्तक वाचण्याची गरज पडत नसे.

पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे शिक्षणसंस्थेतही अस्पृश्यतेचे वातावरण होते. काही प्राध्यापक त्यांना स्टाफसाठी ठेवलेल्या भांड्यांतून पाणी पिण्याची परवानगी देत नसत. हे पाहून भीमराव विचार करत की, जर शिक्षित लोकांची अशी मानसिकता असेल, तर त्यांच्या शिक्षणाचा काय उपयोग?

**बॅरिस्टर म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

बॅरिस्टरीचे शिक्षण घेण्यासाठी १९२० साली लंडनमधील ग्रेज इन येथे त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले आणि १९२३ साली भारतात परतले. भारतालाच आपले कार्यक्षेत्र बनवण्याचा त्यांनी निर्धार केला. समाजातील अन्याय आणि वाईट प्रथा दूर करण्याचा त्यांनी संकल्प केला. परदेशात त्यांना कोणतीही कमी नव्हती, तरीही त्यांनी मुंबई न्यायालयात वकिली सुरू केली.

त्यांची वकिली अत्यंत प्रभावी होती. ते नेहमी सामाजिक न्याय आणि समानतेवर भर देत. काहीच दिवसांत त्यांची गणना मुंबईतील श्रेष्ठ वकिलांमध्ये होऊ लागली. मात्र, अनेक लोक आपले खटले घेऊन येत असत, पण जातीय भेदभावामुळे कागदपत्रे आणि फी दूरून फेकत असत. हे पाहून त्यांचे मन अतिशय व्यथित होत असे.

डॉ. आंबेडकरांना जाणवले की आपले विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वृत्तपत्र आवश्यक आहे. म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे मराठी पाक्षिक सुरू केले. या माध्यमातून त्यांनी समाजातील भेदभाव, अन्याय आणि हक्कांविषयी जागृती निर्माण केली. तसेच दलित समाजाला संघटित करण्याचे कामही त्यांनी केले.

सामान्य आणि गरिब कुटुंबात जन्म असूनही त्यांनी आपल्या तीक्ष्ण बुद्धिमत्ता, कठोर परिश्रम, शिक्षणाची आवड आणि व्यवहारकुशलतेच्या जोरावर अनेक सहकारी मिळवले. यामध्ये अनेक सवर्ण व्यक्तींचाही समावेश होता. त्यांच्यावर त्यांच्या परिश्रम आणि प्रामाणिकतेचा मोठा प्रभाव होता.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवनात अनेक व्यक्तींचे योगदान मान्य केले. त्यामध्ये महाराजा गायकवाड, केळुस्कर गुरुजी, छत्रपती शाहू महाराज, पंडित देवराज नाईक, प्रोफेसर इराणी यांचा विशेष उल्लेख त्यांनी केला आहे. या सर्वांचे सहकार्य आणि प्रेम त्यांनी आयुष्यभर स्मरणात ठेवले.

एका सभेत त्यांनी म्हटले होते, अस्पृश्यांचा उद्धार केवळ अस्पृश्यांच्या बळावर होणार नाही, तर संपूर्ण समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. त्यांचा नेहमी प्रयत्न होता की संपूर्ण हिंदू समाज एकत्र येऊन पुढे जावा आणि त्यातील सर्व कुप्रथा दूर व्हाव्यात.

शेवटी असे म्हणता येईल की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निवडलेला कठीण मार्ग हा केवळ त्यांचा वैयक्तिक संघर्ष नव्हता, तर तो सर्वसामान्य लोकांच्या हक्कांसाठीच्या सामाजिक परिवर्तनाचा पाया होता. त्यांचे कार्य आणि विचार आजही आपल्याला समानता, न्याय आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देतात.

**- श्री. तेजराव खुशाल बागडे**
**(निवृत्त शिक्षक)**

# व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू असणारे महापुरुष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## महामानवाला विनम्र अभिवादन !!

सुजलाम सुफलाम माझा भारत देश या पवित्र भूमीत अनेक थोर महापुरुषांनी जन्म घेऊन आपल्या कर्तृत्वाने समाजाला दिशा दिली. या महापुरुषांच्या विचारांचा वारसा आजही देशवासीयांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरतो. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक सर्वोच्च नाव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नव्हते, तर ते एक विचारधारा होते समतेची, न्यायाची आणि स्वाभिमानाची. त्यांनी आपल्या आयुष्यभराच्या अथक परिश्रमातून समाजातील वंचित, पीडित आणि शोषित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी झटत राहिले.

**शिक्षण – परिवर्तनाचे सामर्थ्य**

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा त्यांचा अमूल्य मंत्र आजही प्रत्येकासाठी मार्गदर्शक आहे. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. ते म्हणायचे,

शिक्षण म्हणजे वाघिणीचे दूध आहे; जो प्यायला तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.

शिक्षणामुळे माणसाला आपल्या हक्कांची व कर्तव्यांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्यतेच्या अंधःकारात अडकलेल्या लोकांना स्वत्वाची ओळख करून देण्याचे महान कार्य त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून केले. आजच्या डिजिटल आणि संगणकीय युगात आपण जे प्रगतीचे शिखर गाठत आहोत, त्यामागे त्यांच्या दूरदृष्टीचा मोठा वाटा आहे.

**समता आणि न्यायाचे योद्धा**

डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी मोठा लढा दिला. त्यांनी महिलांना स्वच्छता, शिक्षण आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व पटवून दिले. १९४२ मध्ये नागपूर येथे झालेल्या परिषदेत त्यांनी महिलांना दिलेला संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.


त्यांनी केवळ दलित समाजासाठीच नव्हे, तर शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेसाठीही आवाज उठवला. अन्याय, अत्याचार आणि गुलामगिरीविरुद्ध त्यांचा संघर्ष अखंड सुरू राहिला. म्हणूनच ते दलितांचे कैवारी म्हणून ओळखले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. कायदा, अर्थकारण, समाजकारण, राजकारण, कामगार हक्क, शेती अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांनी देशाला न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित मजबूत पाया दिला.

उद्धरली कोटी कुळे... भीमा तुझ्या जन्मामुळे

ही ओळ त्यांच्या कार्याची महानता अधोरेखित करते. त्यांच्या विचारांनी लाखो लोकांच्या आयुष्याला नवी दिशा दिली आणि स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य म्हणजे समाजासाठीचे एक महान कर्तव्य आहे. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे आणि आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**महामानवाला कोटी कोटी प्रणाम!**



**संकलन – दिपक कारकर**
**(विरार) – ९९३०५८५१५३**

## बाबासाहेब..

सर्व गुण संपन्न तू
सकल क्षेत्री व्याप्ती
सुसक्षम बौद्धधर्मीय
तथागताची रे शक्ती

जाळले मनूस्मृतीला
अंधत्व श्रध्दा मुक्ती
हाडाचे शिक्षक करी
अखंडित ज्ञानप्राप्ती

भाकरी परी पुस्तका
अजब तुमची भक्ती
अर्थशास्त्रीय गणिती
सार्थ ठरविली उक्ती

महिला सबलीकरणा
बनवी कायद्या सक्ती
बळीराजा सुखी हवा
आपली तीव्रआसक्ती

आपणांसम राजकर्ते
सदैव बसवावे तख्ती
ध्येय धोरणे आखली
समस्त कामगारांप्रति

आंदोलना दिशा देती
जनसेवा उसळे रक्ती
संविधान खास ठेवा
दिला अतुल्य संपत्ती

निळा सूर्य आठवावा
कधीही येता आपत्ती
दुजा कुणी ना जगती
बाबा रमा बाई दंपत्ती

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## भारतीय संगीत विश्वातील एका कर्णमधुर आवाजाचा अस्त...

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन झालं असून वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने एका पर्वाचा अस्त झाला आहे.

भारतरत्न आणि 'गानसम्राज्ञी' लता मंगेशकर यांच्या लहान बहीण असलेल्या आशा भोसले यांना हिंदी सिनेसृष्टीची वर्सटाईल गायिका म्हणून ओळखलं जायचं. तब्बल आठ दशकांमधून आपल्या कर्णमधुर आवाजाने मंत्रमुग्ध करणाऱ्या आशाताईनी शास्त्रीय संगीत, गजल, पॉप, भक्तीगीते, भावगीते, लोकगीते, मादकगीते, कॅबरे, लावणी, ठुमरी, कव्वाली यासारखी गाणी गाऊन इंडस्ट्रीत आपला ठसा उमटविला आहे.

त्यांनी केवळ हिंदीतच नाहीतर, मराठी, बंगाली, गुजराती, तमिल, तेलुगुसह भारतीय २० भाषांमध्ये आणि विदेशी भाषांमध्ये १२००० हजारांवर गाणी गायलीत.'दम मारो दम' आणि 'ओम शांति ओम' यांसारखी अनेक सुपरहिट गाणी आशा भोसले यांनी इंडस्ट्रीला दिली आहेत त्यांच्या या पार्श्वगायनाबद्दल राष्ट्रीय, फिल्मफेअर, विविध राज्यांचे पुरस्कार, दादासाहेब फाळके सन्मान, पद्मविभूषण, आकाशवाणीतर्फे जीवनगौरव, नाईटिंगेल ऑफ एशिया यासारखे त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

त्यांच्या निधनाने चाहत्यांसह संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे अशा या प्लेबॅक सिंगरला विनम्र आदरांजली !

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# राहुल आहेरचे यश इतरांना प्रेरणादायी : आमदार काशिनाथ दाते




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** म्हसोबा झाप येथील ग्रामस्थांच्या वतीने राहुल भानुदास आहेर व त्याचा बीड येथील सहकारी दिपक देवकर यांची पुणे शहर पोलीस दलात निवड झाल्याबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य नागरी सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

या प्रसंगी सह्याद्री ॲकडमीचे संचालक गायकर, डुंबरे यांच्यासह बाळासाहेब गुंड, बाबुराव पवार, सोपान शेलार, अशोक खैरे, अन्सार पटेल, गोविंद आग्रे, भाऊसाहेब आहेर (सरपंच), बाबाजी दरेकर, रामदास दरेकर, सबाजी आहेर, मच्छिंद्र आहेर, तुकाराम आहेर, जयसिंग आग्रे, विठ्ठल आग्रे, बाबाजी आहेर, पोपट आहेर, भानुदास आहेर, बाळासाहेब आहेर, बबन आहेर, आण्णा आहेर, अशोक आहेर, संजय आहेर, कचरू खैरे, झुंबर दुधवडे, संपत मधे, काशिनाथ दुधवडे उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार दाते यांनी राहुल आहेर व दिपक देवकर यांचे तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे, नातेवाईकांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सह्याद्री ॅकडमीचे संचालक गायकर सर, डुंबरे सर यांचे विशेष अभिनंदन केले. आजच्या स्पर्धेच्या युगात सरकारी नोकऱ्यांच्या संधी मर्यादित असल्या तरी पोलीस खात्यासारख्या क्षेत्रात मिळालेलं यश हे मोठं यश आहे. पारनेर तालुका दुष्काळी असल्याने शिक्षण हाच आपल्या तरुणांसाठी खरा मार्ग आहे.

संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला असता पारनेर तालुक्यातील युवक विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कार्यरत असून शिक्षकांची संख्या सर्वाधिक आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांत व्यवसाय करणाऱ्या पारनेरकरांची कामगिरीही उल्लेखनीय आहे. सातत्याने भेडसावणारा दुष्काळ हा आपल्या जिद्दीला धार लावणारा ठरला असून हीच आपत्ती आपल्या प्रगतीची इष्टापत्ती ठरली आहे.

या सत्कार समारंभाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, अशा कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. राहुलच्या यशाचा सन्मान होताना पाहून इथल्या तरुणांमध्येही प्रेरणा निर्माण होईल आणि तेही त्याच्या पावलावर पाऊल ठेवत यश संपादन करतील.

## थोडक्यात

### बोरी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१३, खंडाळा (सातारा) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरी तालुका खंडाळा जिल्हा सातारा यांचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समिती बोरी च्या अध्यक्षा माधुरी केसकर, ग्रामपंचायत बोरी चे कार्यसम्राट सरपंच मेहबूब भाई पठाण, बोरी विकास सेवा सोसायटी चेअरमन भिमराव धायगुडे पाटील, भैरवनाथ यात्रा कमिटी चे अध्यक्ष प्रदीप पिसाळ व शाळेचे मुख्याध्यापक चव्हाण सर,वीर योद्धा प्रतिष्ठान खंडाळा तालुका अध्यक्ष स्वप्निल जावळे,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी केले.

या कार्यक्रमात प्रमुख आकर्षण जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक मिळालेले होजागिरि नृत्य, संत गोरा कुंभार थीम डान्स, कोळीगीत नृत्य, छत्रपती संभाजी महाराज, रेट्रो डान्स, महाराष्ट्राची लोकधारा इत्यादी असंख्य नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले.

या कार्यक्रम प्रसंगी दरवर्षीप्रमाणे शिक्षक दिनाच्या दिवशी ज्या शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले सातारा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला अशा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरी च्या आदर्श शिक्षिका कल्पना राऊत मॅडम यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. तसेच सीईटी शिक्षक पात्रता परीक्षेतील नूतन मॅडम यांचा देशात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल बोरी वेळेवाडी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमासाठी खेड बुद्रुक केंद्रातून केंद्रप्रमुख व सर्व शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते बोरी व वेळेवाडी ग्रामस्थांचे मोलाचे योगदान या स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी लाभले.

### म. फु. कृषी विद्यापीठात बस स्थानक उभारणीची मागणी तीव्र




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१३, राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एक नावाजलेले व प्रतिष्ठित कृषी शिक्षण व संशोधन केंद्र म्हणून ओळखले जाते. राज्यासह देशभरातून विद्यार्थी येथे शिक्षणासाठी दाखल होत असतात. याशिवाय शेतकरी, संशोधक, विविध संस्थांचे प्रतिनिधी तसेच विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने दररोज विद्यापीठ परिसरात ये-जा करत असतात. मात्र, या सर्वांसाठी अत्यंत मूलभूत असलेली बस स्थानकाची सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याने प्रवासी वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विद्यापीठ परिसरातील पूर्वीचे बस स्थानक रस्त्याच्या कामासाठी काही काळापूर्वी पाडण्यात आले होते. सध्या रस्त्याचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आले असूनही नव्याने बस स्थानक उभारणीबाबत कोणतीही ठोस हालचाल दिसून येत नाही. परिणामी, प्रवाशांना उन्हात, पावसात उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. विशेषतः उन्हाळ्याच्या कडक तापमानामुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक यांचे हाल अधिकच वाढले आहेत. बसची वाट पाहताना सावलीसाठी कोणतीही शेड नाही, तसेच बसण्यासाठी बाकांचीही व्यवस्था नसल्याने प्रवाशांना उभ्यानेच वेळ काढावा लागतो. अनेक वेळा बस उशिरा येत असल्याने ही समस्या आणखी तीव्र होते.

विद्यार्थ्यांच्या मते, विद्यापीठासारख्या महत्त्वाच्या शैक्षणिक केंद्रात मूलभूत सुविधा नसणे ही खेदजनक बाब आहे. दररोज शेकडो विद्यार्थी आणि नागरिक येथे येत-जात असतात. बस स्थानकाची सोय नसल्यामुळे मोठी गैरसोय होते. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी प्रतिक्रिया काही विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# महादुला येथे आंबेडकर जयंती निमित्त आरोग्य शिबिर व भीम गीताने अभिवादन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** भारतरत्न व दलिताचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती प्रित्यर्थ क्रांतिवीर श्यामलालबाबू श्रीवास स्मृती बहुद्देशीय संस्था श्रीवास नगर महादुला व लता मंगेशकर हॉस्पिटल डिगडोह यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व औषधं वितरण शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात नेत्ररोग, दंत रोग, स्त्रीरोग, सामान्य रोग तपासणी तज्ञ डॉक्टरद्वारे करण्यात आली त्यात परिसराततील १५० नागरिकांनी लाभ घेतला.

संध्याकाळी काळी ऑरेंज सिटी म्युझिकल ग्रुप नागपूर, विजय मधूमटके आणि संच यांच्या सुमधुर भीम गीताने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवानंदना देण्यात आली.

याप्रसंगी महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. यावेळी श्रीवास नगर मधील अतिशय बिकट परिस्थितीमधून संघर्ष करत १० विद्यार्थी शासकीय सेवेत निवड होऊन रुजू झाल्याबद्दल महसूल मंत्री यांच्या शुभहस्ते स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी अवधूत निखिल काळे (वर्ष ७) या पहिल्या वर्गातील मुलाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अतिशय सुंदर शब्दात भाषण देऊन उपस्थितीतांची मने जिंकली.

कार्यक्रमाला महादुला नगरपंचायतच्या नगराध्यक्ष हेमलता ठाकूर, पोलीस निरीक्षक गणेशजी धुम ाळ, अभिजीत ढेंगरे गटनेता, उपाध्यक्षा वैशालीताई पखीड्डे, नगरसेवक गोपालसिंग नैकाने, अजय सोलंकी, राजकुमार उईके, नगरसेविका स्वातीताई लांडे, सोनूताई उघडे, गंगाताई जैन, स्वातीताई साबळे, स्वातीताई पटले, मनोज सावजी, पंकज ढोणे, राहुल बागडे, सचिन पाटील, पवन पखीड्डे, मुन्ना मेश्राम, ब्रिजलाल खोब्रागडे, पुरण आगासे, घनश्याम मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचालन अमरजीत गोडबोले यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेकरिता नमिता गोडबोले, शोभाताई इंगोले, निकिता लोणारे, शांताबाई खोब्रागडे, वर्षा तानोडे, आशा यादव, मंदा मोटघरे, सपना गजभिये, राहुल इंगोले, सुमित मेघराज, प्रवीण वानखेडे, अनिकेत वाणी, विक्की खरवडे, राजेश बोरकर, दिपक सूर्यवंशी, निरंजन वालदे, राजकुमार नारनवरे, अभिजीत इंगोले, प्रितेश वानखेडे, योगेश मेश्राम, नीतून आगासे आदींनी परिश्रम घेतले.

# विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस येथे संविधानाचा जयघोष

## जगातील सर्वात मोठ्या 'संविधान ग्रंथा' च्या निर्मितीचा शुभारंभ

## बाबासाहेबांच्या संविधानामुळेच मी सरन्यायाधीश बनू शकलो - भूषण गवई

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, कामठी (नागपूर) :** भारतीय लोकशाहीची जननी असलेल्या भारतीय संविधानाचा जागर आता सातासमुद्रापार जाणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून आज विश्वविख्यात 'ड्रॅगन पॅलेस टेम्पल' येथे एका अभूतपूर्व जागतिक इतिहासाची पायाभरणी करण्यात आली. जगातील सर्वात मोठ्या आणि वजनदार 'संविधान ग्रंथाच्या' निर्मितीचा ऐतिहासिक शुभारंभ भारताचे माजी सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

मुख्य पाहुणे म्हणून बोलताना माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी अत्यंत भावूक उद्गार काढले. ते म्हणाले, आज मी सर्वोच्च न्यायालयाच्या सर्वोच्च पदावर विराजमान होऊ शकलो, त्याचे सर्व श्रेय फक्त आणि फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी दिलेल्या संविधानाला आहे. बाबासाहेबांनी या देशाला दिलेली ही देणगी जगातील सर्वोत्तम कलाकृती आहे.

यावेळी त्यांनी लोकनेते दादासाहेब कुंभारे यांच्या कार्याला अभिवादन करताना म्हटले की, दादासाहेबांनी आयुष्यभर बिडी कामगारांच्या आणि गरिबांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याचे काम केले. आज सुलेखाताईंनी तोच वारसा पुढे चालवत संविधानाचा हा विश्वविक्रमी उपक्रम हाती घेतला आहे, हे पाहून मनस्वी आनंद होत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात धम्मचक्र प्रवर्तन दिनी जगातील सर्वात मोठ्या ''संविधान ग्रंथा'चा शुभारंभ येत्या धम्म चक्र प्रवर्तन दिनी होणार असल्याची घोषणा केली.

आपल्या सविस्तर आणि प्रेरणादायी प्रास्ताविक भाषणात ॲड. सुलेखाताई कुंभारे म्हणाल्या की, संविधान हा केवळ आपल्या देशाचा कायदा नाही, तर तो प्रत्येक भारतीयाचा स्वाभिमान आणि जगण्याचा आधार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या या संविधानामुळेच आज सामान्य माणूस सत्तेच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकला आहे. हा विचार जागतिक स्तरावर नेण्यासाठीच आम्ही 'जगातील सर्वात मोठा संविधान ग्रंथ' साकारत आहोत.

पुढील नियोजनाबाबत माहिती देताना त्या म्हणाल्या, आज या ग्रंथाच्या निर्मितीचा शुभारंभ झाला असून, अहोरात्र कष्ट घेऊन हा प्रकल्प पूर्ण केला जाईल. येत्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी, जेव्हा लाखो अनुयायी बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन एकत्र येतात, त्याच ऐतिहासिक दिवशी या ग्रंथाचे भव्य लोकार्पण केले जाईल.

मंचावर माजी नगर परिषद उपाध्यक्ष अजय कदम, वर्ल्ड रेकॉर्डस इंडिया'चे सीईओ पवन सोलंकी, मनीष पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यानंतर जगातील सर्वात मोठ्या संविधान ग्रंथाचा सुप्रीम कोर्टाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

हा ग्रंथ आकाराने आणि वजनाने जगातील सर्वात मोठा ग्रंथ ठरणार असून, 'वर्ल्ड रेकॉर्डस इंडिया'चे सीईओ पवन सोलंकी यांच्या उपस्थितीत याची अधिकृत नोंद घेतली गेली.

या महाकाय प्रकल्पाची मूळ संकल्पना मनीष पाटील यांची असून, ओगावा सोसायटीच्या माध्यमातून हा प्रकल्प पूर्णत्वास नेला जात आहे.या ऐतिहासिक सोहळ्यासाठी नागपूर जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातून हजारो अनुयायी ड्रॅगन पॅलेसमध्ये दाखल झाले होते.

या ऐतिहासिक कार्यक्रमामध्ये माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेश भोयर, माजी कुलसचिव पुरण मेशाम, माजी नगराध्यक्ष शकुर नागानी, माजी नगराध्यक्षा माया चवरे, माजी नगराध्यक्ष हसन अली, विरोधी पक्ष नेता काशीनाथ प्रधान, डॉ. संदीप कश्यप, संजय कनोजिया, माजी उपाध्यक्ष अहफाज अहमद, नगरसेवक नियाज कुरेशी, नगरसेवक आकाश भोकरे, नगरसेवक अनिल सुर्यवंशी, नगरसेवक निरज यादव, नगरसेवक नितेश यादव, माजी नगरसेवक निरज लोणारे, नागपुर येथील दिक्षाभुमीचे सदस्य विलास




गजघाटे, आंबेडकरी नेते दिनेश बंसोड, रवि रंगारी, अरविंद वाळके, दिपक सिरीया, चंदू लांजेवार, सुभाष सोमकुवर, उदास बंसोड, दिपंकर गणविर, अंकुश बांबोर्डे, अनुभव पाटिल, संदीप कांबळे, विकास रंगारी, उज्वल रायबोले, ड्रॅगन इंटरनॅशनल स्कूल च्या मुख्याध्यापिका अंबरीन फातीमा, हरदास विद्यालय चे मुख्याध्यापक देवेंद्र जगताप, दादासाहेब कुंभारे विद्यालय चे मुख्याध्यापक राजेश गजभिये, दादासाहेब कुंभारे बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्रचे प्राचार्य सागर भावे, हरदास प्राथमिक शाळेचे विनोद तातोडे, इत्यादी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता सुनिल वानखेडे, राजेश शंभरकर, चंदु कापसे, सुशील तायडे, सचिन नेवारे, संदेश दमके, नरेश बावनकुळे, सय्यैद ओएस, मो. इरशाद, मो. अरबाज, मो. सादीक, सुल्तान खान, मो. अहफाज, ईत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

कामठीच्या या ऐतिहासिक उपक्रमामुळे केवळ जिल्ह्याचेच नव्हे, तर संपूर्ण देशाचे नाव जागतिक स्तरावर अभिमानाने झळकणार आहे. कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रपाल मेश्राम यांनी केले तर उपस्थितांचे आभार विनोद जुमडे यांनी मानले.